# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. ०५ नोव्हेंबर २०२२

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५४९/२०२२ भादंविसक २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४,१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०२/११/२०२२ रोजी ०५.४५ वा ते ०६.०० वा चे दरम्यान, टाटा मोटर्स समोर, होटगी रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०४/११/२०२२ रोजी २२.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उषा सत्येश्वर पाटील, वय- ६७ वर्षे, रा. काडादी नगर, होटगी रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | शिवपुत्र बसण्णा सिंदगी, रा. मु.पो. आहेरवाडी, ता. दक्षिण सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या त्यांची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी के ९३६३ वरुन गांधी मोटर्स, होटगी रोड, सोलापूर येथील डिव्हायडरमधुन विठ्ठल मंदिर काकड आरतीकरीता जात असताना आसरा चौकाकडुन येणारा वरील आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन क्रं. एम एच १३ बी एन ४१०६ ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे, हयगयीने चालवून फिर्यादीस पाठिमागुन जोराने धडक दिली. त्यात फिर्यादीचे डावे पायाच्या खाली उजव्या पायाचे घोटाचे ठिकाणी, डावे बाजुचे चार बरगडे फ्रॅक्चर डावे हातास व दोन्ही गुडघ्यांस खरचटनेस वरील आरोपीत कारणीभुत झाला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ११९५ बहिर्जे - |

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८३५/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/१०/२०२२ रोजी ०६.०० वा ते ११.०० वा चे सुमारास, रेल्वे स्टेडीयम जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०४/११/२०२२ रोजी २१.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | भगवान रामअधार दास, वय- ४६ वर्षे, रा. रेल्वे कॉर्नर, २१५८/ए, पोटर चाळ, डी आर एम ऑफिस शेजारी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २०,०००/- रु एक काळया रंगाची त्यावर लाल पट्टा असलेली हिरो एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी वाय २४६४ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन ठेवलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, हॅन्डल लॉक तोडुन अगर डयुप्लीकेट चावीचा वापर करुन, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ८१५ आटुळे- |